नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६९ Issue - 169 | वार - सोमवार दि. १६ नोव्हेंबर २०२६ Blow- Monday Date 16 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

जनजाती गौरव दिन हा आदिवासी समाजाच्या अभिमानाशी जोडलेला सण

आदिवासी विकासासाठी १ लाख कोटींचं बजेट, गडचिरोलीत पंतप्रधान मोदींची मोठी घोषणा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



गडचिरोली : 'एक काळ असा होता जेव्हा देशातील अनेक दिवस आणि सण परदेशी दृष्टिकोनातून ठरवले जात होते. मात्र, आज भारत स्वदेशी आत्मसन्मानाने आपला वारसा, इतिहास आणि नायकांचे स्मरण करत आहे. हे देशाच्या राष्ट्रीय चेतनेतील एका मोठ्या बदलाचे प्रतीक आहे.

आदिवासी अभिमान दिनाचा उत्सव १५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरू झाला आणि आज तो एक राष्ट्रीय सण बनला असल्याचे सांगत जनजाती गौरव दिन हा आदिवासी समाजाच्या अभिमानाशी जोडलेला एक सण असल्याचे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधान मोदी आज (रविवार) क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या १५१व्या जयंतीनिमित्त गडचिरोलीत देशस्तरीय जनजाती गौरव दिनाचा देशस्तरीय कार्यक्रमात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बोलत होते.

दरम्यान, गडचिरोलीतील जनजातीय गौरव दिनाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाचा गौरव केला. आदिवासी समाजाने नेहमी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, तसेच पीएम जनमन योजना आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानासाठी एक लाख कोटी रुपयांहून अधिक बजेटची तरतूद केल्याचंही त्यांनी सांगितलं.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, एक काळ असा होता जेव्हा भारतातील अनेक दिवस आणि सण परदेशी दृष्टिकोनातून ठरवले जात होते. आज देश स्वदेशी आत्मसन्मानाने आपला वारसा, इतिहास आणि नायकांचे अभिमानाने स्मरण करत आहे. हे आपल्या राष्ट्रीय चेतनेतील एका मोठ्या बदलाचे प्रतीक आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, आदिवासी अभिमान दिन हा आदिवासी समाजाच्या अभिमानाशी जोडलेला एक सण आहे. यामागे भगवान बिरसा मुंडा यांची प्रेरणादेखील आहे. देशभरातून या कार्यक्रमात सहभागी झालेल्यांचे अभिनंदन करून पंतप्रधानांनी धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदराने आदरांजली वाहिली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, १५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरू झालेला आदिवासी अभिमान दिनाचा उत्सव आता राष्ट्रीय सण बनला आहे. गेल्या वर्षी, भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त देशभरात दोन लाखांहून अधिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये लाखो देशवासियांनी सहभाग घेतला होता. पुढे ते म्हणाले की, आज देशभरात आदिवासी अभिमान दिनाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत आणि भारत आपल्या आदिवासी वीरांगनांचे अभिमानाने स्मरण करत आहे. भगवान बिरसा मुंडा यांचे बंड आणि तरुण वयातील त्यांचा संघर्ष आजही लाखो देशवासियांसाठी एक मोठी प्रेरणा असल्याचे त्यांनी सांगितलं.

बंगालच्या खाडीत अक्कान चक्रीवादळ, १४५ किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क


नवी दिल्ली : बंगालच्या खाडीत सध्या कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. या कमी दाबाच्या क्षेत्राचे रुपांतर पुढच्या काही तासांमध्ये चक्रीवादळाच्या रुपात होणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या कमी दाबाच्या क्षेत्राचे १६ नोव्हेंबरला चक्रीवादळात रुपांतर होणार आहे. हे चक्रीवादळ १७ नोव्हेंबरला रौद्ररुप धारण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे या दिवशी वाऱ्याचा वेग हा ताशी १४५ किमी इतका राहणार आहे. या चक्रीवादळाचे अक्कान असे नाव ठेवण्यात आले आहे.

अक्लान चक्रीवादळ हे आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर धडकणार आहे. हे वादळ किनाऱ्यावर धडकण्याआधीच समुद्राच्या लाटादेखील रौद्ररुप धारण करण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश पासून ओडिशा, तामिळनाडू, अंदमान, झारखंड या ठिकाणी अलर्ट जारी करण्यात आला आहे. चक्रीवादळाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर मच्छिमारांना समुद्रातून परत किनाऱ्यावर परतण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आंध्र प्रदेशात उद्या म्हणजेच १६ नोव्हेंबरला ढगाळ वातावरण राहील. तर काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाची पावसाची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे.

भारताला बदनाम करुन सत्ता मिळणार नाही

अमित शाह यांचा पुण्यात राहुल गांधींवर निशाणा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



पुणे : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या भाषणातून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित करत केंद्र सरकारच्या सहकारविषयक निर्णयांची माहिती दिली. महाराष्ट्र ही देशात सर्वप्रथम सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवणारी भूमी असल्याचे अमित शाह म्हणाले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल ७० वर्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारमध्ये स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली. काँग्रेसच्या कार्यकाळात शेतकरी स्वतंत्र सहकार मंत्रालयाची मागणी करत होते. मात्र त्यांची मागणी मान्य करण्यात आली नाही. भाजप सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन करून ही मागणी पूर्ण केल्याचे शाह यांनी सांगितले.

काँग्रेसच्या काळात अनेक साखर कारखाने बंद पडले. मात्र आता ते पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न केले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. यासोबतच देशभरात 'भारत टॅक्सी' सेवा सुरू करण्याची घोषणा करताना अनेक खासगी टॅक्सी कंपन्यांकडून चालकांचे शोषण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, अमित शाह यांनी काँग्रेसवर निशाणा साधत सलग तीन निवडणुकांतील पराभवाचा राग पक्षाकडून काढला जात असल्याची टीका केली. राहुल गांधी यांनी भारताची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही त्यांनी केला.

भारताला बदनाम करून सत्ता मिळणार नाही. परदेश दौरे बंद करून गावोगावी फिरा, जनतेमध्ये काम करा, तर कधीतरी तुमचा नंबर लागू शकतो, अशा शब्दांत अमित शाह यांनी राहुल गांधी यांना सल्ला दिला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बदनाम करण्याचा राहुल गांधी यांचा प्रयत्न निषेधार्ह असल्याचे म्हणत शाह यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली.

अमित शाह यांच्या या भाषणामुळे सहकार क्षेत्रासोबतच काँग्रेस-भाजपमधील राजकीय आरोप-प्रत्यारोप पुन्हा चर्चेत आले आहेत. अमित शहा हे पुण्याच्या तळेगावमध्ये बोलत होते.

पुण्यातील तळेगाव येथे नेशन हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव लिमिटेड मल्टी स्टेट सहकारी संस्थेचे भूमिपूज देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते झाले. यावेळी मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह इतर नेतेमंडळी उपस्थित होते. दरम्यान, गेल्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडल्या आहेत. राज्याच्या राजकारणात सध्या दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण आता खासदार सुप्रिया सुळे यांनी या वृत्ताचं खंडन केलं आहे. दुसरीकडे मतदारसंघ पुनर्रचना विधेयक आगामी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सरकारकडून पुन्हा मांडलं जाणार आहे. त्यामुळे या घडामोडींची पार्श्वभूमी असल्याने अमित शाह यांच्या पुणे दौऱ्याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. दुसरीकडे अमित शाह यांनी पुण्यातील कार्यक्रमात राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.

पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात विहीर खोदकाम दरम्यान

माती व दगडाच्या ढिगारा कोसळून चार कामगारांचा दुर्दैवी मृत्यू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात भिर खोदकामाच्या दरम्यान माती व दगडाचा ढिगारा कोसळून झालेल्या दुर्घटनेत चार कामगारांचा दुर्दैवी मृत्यू यामध्ये मंगेश मोरे ,सिद्धेश्वर पांढरे, तानाजी घोडके ,आणि आबा घोडके ,यांच्या मृतांमध्ये समावेश आहे व या हृदयीद्रावक घटनेत परिसरात शोककळा

पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात शेतामध्ये विहीर खोदकामाचे काम सुरू असताना माती व दगडाचा मोठा भरावा अचानक कोसळल्याने चार कामगारांची दुर्दैवी मृत्यू झाल्याने हृदय द्रावक घटना घडली रोजी रोटी साठी दररोज काम करणाऱ्या या कामगारांना काळाने अचानक घाला घातल्याने संपूर्ण परिसरात शोक पुसले व कामगारांचा दुर्दैव झाल्याने पुन्हा एकदा सुरक्षितता प्रश्न ऐरणीवर आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार आंबे गावात शेतामध्ये तीस फूटभर कुली खोदण्याचे काम सुरू होते. वीर विहिरीची काम करणाऱ्या काम गारांच्या अंगावर माती व दगडाचा ढगाला अचानक कोसळल्याने चारही कामगार अधिकाऱ्याखारी काढली गेले. या अपेक्षित घटनांमुळे घटनास्थळी अचानक एकच धावपळ उडाली, घटनेची माहिती मिळतात प्रशासनाचे अधिकारी दाखल झाले. विहिरीतील माती व दगड यांचा भरवा बाजूला करून मातीमधील घडलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य हातात घेण्यात आले मात्र या दुर्घटनेच्याही कामाला आपला जीव गमवावा लागला.



दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

जनजाती गौरव दिन

नक्षलवादी हिंसाचाराच्या प्रभावातून बाहेर पडत देशातील आदिवासीबहुल भाग विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करीत आहेत. दुर्गम गावांपर्यंत शिक्षण, आरोग्य, निवास, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा विस्तार होत असून आदिवासी समाजाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडत आहे. भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त गडचिरोली येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित जनजातीय गौरव दिनाच्या राष्ट्रीय सोहळ्यात प्रधानमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात 'जोहार' या पारंपरिक अभिवादनाने केली. गडचिरोलीतील मोठ्या जनसमुदायाचे आणि आदिवासी संस्कृतीचे कौतुक करत त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्यासह क्रांतिवीर बाबूराव शेडमाके, राघोजी भांगरे, खाज्या नाईक, राणी दुर्गावती, टंट्या भिल्ल आणि अन्य आदिवासी स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या योगदानाचे स्मरण केले. नक्षलवादी हिंसाचारामुळे अनेक दशके आदिवासी समाजाच्या विकासात अडथळे निर्माण झाले. मात्र, सुरक्षा यंत्रणांचे प्रयत्न आणि केंद्र व राज्य शासनाच्या विकासाभिमुख धोरणांमुळे परिस्थितीत मोठा बदल होत आहे. पूर्वी हिंसाचाराच्या छायेत असलेल्या भागांमध्ये आता शाळा, रस्ते, आरोग्य सुविधा, उद्योग आणि रोजगाराच्या संधी निर्माण होत आहे. गरिबी निर्मूलनाच्या क्षेत्रात देशाने महत्त्वपूर्ण प्रगती केली असून विकासाच्या प्रक्रियेत मागे राहिलेल्या समाजघटकांना प्राधान्य देण्यात येत आहे. 'वंचितों को वरीयता' या धोरणानुसार दुर्गम आदिवासी वस्त्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यात येणार आहे. पीएम जनमन आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाच्या माध्यमातून आदिवासी भागांमध्ये पक्की घरे, पिण्याचे पाणी, वीज, रस्ते, आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या राष्ट्रीय सोहळ्यात विविध राज्यांतील एकलव्य आदर्श निवासी शाळा, आश्रमशाळा, वसतिगृहे, आदिवासी संशोधन संस्था आणि बहुउद्देशीय केंद्रांशी संबंधित प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील २२ आश्रमशाळा व वसतिगृहांशी संबंधित सुविधांचाही समावेश आहे.

जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह उत्साहात साजरा

आदिवासी लाभार्थ्यांना लाभवितरण; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/जि.मा.का. : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांच्यावतीने जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने आदिवासी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वितरण, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या महिला बचत गटांना निवडपत्र व धनादेश वितरण तसेच आदिवासी नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.





कार्यक्रमाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी यांच्या हस्ते क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.



यावेळी मार्गदर्शन करताना अपर जिल्हाधिकारी श्री. निन्हाळी म्हणाले, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ समाजातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी घ्यावा. विशेषतः महिला, विद्यार्थी व महिला बचत गटांसाठी असलेल्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या योजनांचा लाभ घेऊन प्रगती साधावी. आदिवासी समाजातील कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी पालकांनी शासनाच्या शैक्षणिक योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त सर्व आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील गडचिरोली येथे हा कार्यक्रम संपन्न होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व अभिमान व्यक्त केला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याचे स्मरण करणे, आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास जतन व प्रसारित करणे, समाजाचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक सक्षमीकरण करणे तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचविणे हा आहे.

प्रास्ताविकात प्रकल्प संचालक धनंजय झाकर्डे यांनी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांतील आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. आदिवासी पारधी समाजातील मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी तीन आश्रमशाळा, एक सैनिक शाळा, दोन नामांकित शाळा आणि सहा वसतिगृहे कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी, प्रकल्प संचालक धनंजय झाकर्डे, कार्यालय अधीक्षक सुधाकर भांगरे, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक प्रदीप समुद्रे, आदिवासी समाजातील वैजू काळे, राजेश काळे, ज्ञानेश्वर भोसले, चव्हाण, ॲड. बबीता काळे, सामाजिक कार्यकर्त्या पार्वती काळे, ॲड. नितीन शिंदे, शाहीर शिंदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व सम ारोप आश्रमशाळेचे मुख्याध्यापक प्रदीप समुद्रे यांनी केला.

शहाजी बापू पाटील यांच्या सोशल मंचाच्या सोलापूर जिल्हा सहसचिव पदी पिंटू कदम यांची निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सांगोला : सांगोला तालुक्यातील मोहोळ येथील प्रगतशील बागायतदार व शेतकरी चळवळीतील अभ्यासू व्यक्तिमत्व असलेली पिंटू कदम यांची शहाजी बापू सोशल मंचाच्या सोलापूर जिल्हा सहसचिव पदी निवड करण्यात आली आहे.



या निवडीचे पत्र सांगोला तालुक्याचे युवक नेते यांच्या शुभहस्ते देण्यात आले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, बापू धायतडक, अंकुर कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

यांच्या प्रश्नासाठी सदैव लागणारे नेतृत्व महूद येथील पिंटू कदम हे काय शेतकरी बांधवांसाठी लढत आहेत त्यांचा स्वभाव मनमिळावा असून ते नेहमीच शेतकऱ्यांसाठी गोरगरिबांच्या मदतीसाठी. धावून जातात.

त्यांच्या या सामाजिक व शेतकरी आणि जनहिताच्या कार्याची दखल घेत सांगलीची माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी सोशल म्हणजे जी महत्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवले आहे या निवडीमुळे शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सणातून पिंटू कदम यांच्यावर अभिनंदन आता वर्षाव होत आहे.

लोक कलावंतांना शासनामार्फत किमान दहा हजार रुपये आर्थिक मदत मिळावी : रवींद्र शेवडे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरीतील कलाकारांनाउपासमारीची वेळ, हाताला काम नाही कोरोनाची परिस्थिती निर्माण झाल्याने काम मिळाले कठीण झाले आहे व कलाकारांच्या अनेक व्यथा आहेत.



लोकाला करताना शासनामार्फत किमान दहा हजार रुपये मिळावेत व कलाकारांच्या मुलींच्या लग्नासाठी तसेच धुरंदर आजारासाठी आर्थिक मदत मिळावी शाहीर विश्वनाथ शिंदे यांना अनेक वर्षांपासून कलाकारांना मानधन सुरू करावे अशी मागणी पत्रकार परिषदेत करण्यात आली.

दुःखी असताना आपली दुःख लपवून समोरच्या व्यक्तींना हसवण्याचे महान कार्य कलाकार करतात सोलापूर जिल्ह्यातील किमान ५०० कलावंतांना मानधनासाठी मंजुरी मिळावी अशी मागणी पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आली.



शाश्वत आणि सर्वांगीण विकास करून महान गडचिरोली बनवून दाखवू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

लॉयड्सच्या कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे लोकार्पण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

गडचिरोली : खनिज संपत्तीने समृद्ध असलेल्या गडचिरोलीचे आम्हाला शोषण नाही तर दोहन करायचे आहे. शाश्वत विकास हे आमचे लक्ष्य आहे. या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करून भविष्यात महान गडचिरोली बनवून दाखवू, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

लॉईडस अँड मेटल एनर्जी ली. तर्फे बोदली येथे उभारण्यात आलेल्या लॉईडस मिशन फॉर ग्लोबल स्किल्स अँड एंटरप्रेनरशिप केंद्राचे लोकार्पण आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय आदिवासी कार्यमंत्री जुअल ओराम यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

लॉयड्सने गडचिरोली परिसरात केलेला विकास हा नफा केंद्रित नव्हे तर माणूस केंद्रित असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समाजाला सोबत घेऊन जेव्हा सर्वसमावेशक विकासाकडे जातो, तेव्हा सोशल प्रॉफिट म्हणजे समाजाचे आशीर्वाद मिळतात. ते काम लॉयड्सच्या माध्यमातून येथे होत आहे. जे कधी काळी नक्षलवादी होते ते आता प्रशिक्षण घेऊन कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. वेगवेगळ्या उद्योगांस लागणारे मनुष्यबळ या केंद्रात तयार होत आहे. पाच वर्षापूर्वी येथे यायला घाबरायचे आज येथील तरुणी विदेशात जाऊन तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत, हा बदल आहे.

येथे येत असलेल्या उद्योगांमुळेश्र थोडी बहुत झाडे कापावी लागली तरी, वनांचे रक्षण झाले पाहिजे. त्यामुळेच गडचिरोलीत ५ कोटी झाडे लावण्याचा संकल्प आम्ही केला व त्यापैकी एक कोटी झाडे लावली असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. हरित गडचिरोली अधिक हरित करण्याचे काम आम्ही करू, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी केंद्रीय मंत्री ओराम यांचेही भाषण झाले. प्रास्ताविक लॉयड्सचे प्रबंध संचालक बी. प्रभाकरन यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अडीच हजार नियुक्ती पत्रांचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले..डव्हान्स मिनरल प्रोसेसिंग वर्कशॉप, लॉयडस सेंट्रल किचन, ग्रीवन्स रिड्रेसल पोर्टल या उपक्रमांचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला गडचिरोलीचे खा. नामदेव किरपान, आ. धर्मराव बाबा आत्राम, आ. डॉ. मिलिंद नरोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गडचिरोलीतील स्थानिक तरुण आणि महिलांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम आणि स्वावलंबी बनवणे हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे.

उपलब्ध प्रमुख प्रशिक्षण अभ्यासक्रम

तांत्रिक आणि अभियांत्रिकी कौशल्ये. वेल्डिंग, इलेक्ट्रिकल, सोलर तंत्रज्ञान, प्लंबिंग, एमईपी आणि दुचाकी वाहन दुरुस्ती.

बांधकाम आणि सुरक्षा.

बांधकाम, गवंडीकाम, बार बेंडिंग आणि सुरक्षा रक्षक.

लॉजिस्टिक्स आणि ड्रायव्हिंग.

हलकी व जड वाहने चालविणे, वेअरहाउस असोसिएट, आणि सप्लाय चेन.

हॉस्पिटॅलिटी आणि डिजिटल कौशल्ये.

हॉटेल मॅनेजमेंट, पाककला, फूड अँड बेव्हरेज, फ्रंट ऑफिस, हाऊसकीपिंग, पर्यटन आणि मूलभूत डिजिटल कौशल्ये.

उद्योजकता विकास.

स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण.

लोनाड ग्रामपंचायतीच्या वतीने वनराई बंधाऱ्याची उभारणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : परतीच्या पावसाने पाठ फिरवल्याने परिसरात पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असून नदी-नाले आटू लागले आहेत. याचा फटका शेतीला बसण्याची शक्यता लक्षात घेऊन मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानांतर्गत भिवंडी तालुक्यातील लोनाड ग्रामपंचायतीच्या वतीने कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या श्रमदानातून हरणपाडा येथील ओढ्यावरएकूण ३ वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. या उपक्रमामुळे पाणी अडविण्यास मदत होणार



असून भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

लोनाड ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी व्यंकटी धोंडगे यांनी पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन कर्मचारी व ग्रामस्थांना 'पाणी अडवा, पाणी जिरवा' उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रशासक अरुण बडगुजर यांचे मार्गदर्शन लाभले.



त्यानुसार सर्वांनी एकत्र येत श्रमदानातून वनराई बंधारा उभारला. यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गोण्यांची व्यवस्था करण्यात आली.

परतीच्या पावसाने दडी मारल्याने रब्बी हंगामातील पिकांसाठी पाण्याची टंचाई जाणवण्याची शक्यता आहे. विशेषतः भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनी लागवडीसाठी केलेला खर्च आणि पिकांच्या संगोपनासाठी आवश्यक असलेले पाणी यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. अशा परिस्थितीत वनराई बंधाऱ्यात पाणी साठल्यास शेतीसाठी त्याचा उपयोग होण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमामुळे पाणी अडविण्यासोबतच भूजल पातळी वाढण्यासही हातभार लागण्याची अपेक्षा आहे. ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदानातून राबविलेला हा उपक्रम जलसंधारणाबाबत लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

आंबे येथील विहीर दुर्घटनास्थळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांची भेट

बचावकार्याचा घेतला आढावा; संबंधित यंत्रणांना दिल्या आवश्यक सूचना



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील आंबे येथे विहीर खोदकाम सुरू असताना मातीचा ढिगारा कोसळून चार कामगार अडकल्याच्या दुर्घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

विहीर मालक दत्तात्रय निवृत्ती शिंदे यांच्या शेतात जेसीबीच्या साहाय्याने विहीर खोदण्याचे काम सुरू असताना सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मातीचा ढिगारा कोसळला. यामध्ये मंगेश मोरे (वय ३५), सिद्धेश्वर घाडगे (वय ४५), आबासाहेब घोडके (वय ५०) आणि तानाजी घोडके (वय ५४) हे चार कामगार मातीखाली अडकले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनासह संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याची माहिती घेतली तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेतला.

अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर प्रशासनाचे लक्ष असून, बचावकार्याला आवश्यक ती गती देण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी दगड मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नातेवाईकांशी संवाद साधून धीर दिला.

यावेळी त्यांच्यासमवेत अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, पंचायत समितीचे सभापती शुभम आगवणे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड उपस्थित होते.

हे बचाव कार्य पंढरपूर नगरपालिका अग्निशामक दल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, तालुका प्रशासन यांच्यामार्फत सुरू असून, बचाव कार्य साठी एनडीआरएफचे पथक देखील येणार आहे.

दुष्काळी परिस्थितीचे भान, गाईंना चारा देवून साजरा केला वाढदिवस



अरुण कोळी यांच्या उपक्रमाचे कौतुक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : सोलापूर जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये भीषण पाणी टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दुष्काळाच्या तीव्र झळांनी होरपळणाऱ्या पशु अन् बळीराजाला माणुसकीच्या दृष्टिकोनातून दिलासा देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अरुण कोळी यांनी आपला वाढदिवस रद्द करुन वाढदिवसासाठी होणारा खर्च गाईंच्या चाऱ्यासाठी देऊ केला. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सोलापूर जिल्ह्यात यंदा अपुरा पाऊस झाल्याने, चारा आणि पाण्याची अवस्था बिकट झाली आहे.

बार्डी येथील शासकीय वनावरील वन गाईंची दुष्काळामुळे उपासमार होत असते.

ज्या मुक्या जनावरांना पालक आहेत त्यांना वेळेवर चारा पाणी मिळू शकतो. मात्र वनात भटकणाऱ्या जनावरांची उपासमार होत असते.

या मुक्या जनावरांचे हाल लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते अरुण कोळी यांनी आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेत वाढदिवसाला होणारा खर्च बार्डी येथील वन गाईंना चारा उपलब्ध करुन साजरा केला.

यावेळी वैभव उर्फ सोनु कोळी, अथर्व गायकवाड, निरज परचडे, अमोल माने, प्रसाद कोळी, सचिन नेहतराव आदी उपस्थित होते.

आमदार डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश; सांगोला पोलीस वसाहतीचा प्रश्न मार्गी लागणार!

पोलीस स्टेशन व निवासस्थानाच्या नवीन इमारतीसाठी शासनाची सकारात्मक भूमिका; प्रकल्पाचा प्राधान्यक्रम यादीत समावेश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सांगोला : सांगोला येथील पोलीस वसाहतीच्या दुरवस्थेचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. आमदार डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, सांगोला पोलीस स्टेशन व पोलीस निवासस्थानाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचा प्रकल्प शासनाच्या प्राधान्यक्रम यादीत समाविष्ट करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात लेखी उत्तर देत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उपस्थित करण्यात आलेल्या या प्रश्नाच्या अनुषंगाने आमदार डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांनी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कपात सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधले होते. सांगोला येथील पोलीस वसाहतीची दुरवस्था लक्षात घेता पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना चांगल्या सुविधा असलेली निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली होती.

या मागणीला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, गृह विभागाच्या २१ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या प्राधान्यक्रम यादीमध्ये पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या अंतर्गत सांगोला पोलीस स्टेशन व निवासस्थान बांधकाम प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे.

तसेच, या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, प्रकल्पाचे संकल्पन नकाशे व आराखडे तयार करण्याचे काम प्रगतिपथावर असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी लेखी उत्तरात नमूद केले आहे.

पोलीस अधिकारी व कर्मचारी अहोरात्र जनतेच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावत असतात. मात्र, त्यांच्यासाठी पुरेशी आणि सुविधायुक्त निवासस्थाने उपलब्ध असणेही तितकेच आवश्यक आहे. सांगोला येथील पोलीस वसाहतीची झालेली दुरवस्था पाहता नवीन पोलीस वसाहत आणि पोलीस स्टेशनच्या इमारतीची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. आमदार डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांनी या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे आता या प्रकल्पाला शासनस्तरावर सकारात्मक दिशा मिळाली आहे.

आमदार डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना मिळालेले हे यश सांगोल्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे. आता प्रकल्पाचे आराखडे लवकरात लवकर पूर्ण करून आवश्यक निधीची तरतूद करावी आणि प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

भाळवणीत गुणगौरव सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील चौगुलेवाडी येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने स्नेह मेळावा व गुणगौरव सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे लातूरचे उपजिल्हाधिकारी विजयजी लामकाने साहेब हे उपस्थित होते. यावेळी शिक्षण, नोकरी, व्यवसाय, उद्योग, समाजसेवा या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणवंतांचा शाल, सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव करण्यात आला. सन्मानित झालेल्या सर्व गुणवंतांचे प्रमुख पाहुण्यांनी कौतुक करुन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या या वेळी आपल्या मनोगतात प्रमुख पाहुणे यांनी शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त व समाजाप्रती असलेली जबाबदारी यांचे महत्त्व विशद केले.

यावेळी निर्मला अंगडी म्हणाल्या की आपल्या आजी आजोबा, आई वडील शिक्षक यांचा आदर राखला पाहिजे. शिक्षण घेतल्या शिवाय आपल्या घराची प्रगती होत नाही. येथील मुलांनी चांगले शिक्षण घेऊन आपली प्रगती करावी. असे अंगडी म्हणाल्या.

यावेळी भगवानराव माने -चौगुले, शिवाजी बाबर, सरपंच रणजित जाधव, निर्मला अंगडी, शुक्राचार्य गवळी,हभप तात्या महाराज ,राजकुमार पाटील,धैर्यसिंह निंबाळकर, सुनील पाटील, विठ्ठल माने -चौगुले, हरिदास माने -चौगुले,सागर माने -चौगुले शिक्षक सुरेश शिंदे, चंद्रकांत वाघमारे,सुनील गवळी, प्रशांत माळवदे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिवाजी बाबर, बजरंग माने -चौगुले,चंद्रकांत वाघमारे गुरुजी तसेच सन्मानित प्रा. मुक्ता धुमाळ, ज्ञानेश्वर माने -चौगुले, डॉ. आकाश माने -चौगुले, सुहास माने-चौगुले, अमरसिंह माने -चौगुले, पांडुरंग



माने -चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यकमाची सुरुवात वैष्णवी माने हिच्या स्वागतगीताने केली प्रास्तावीक रुपेश महाराज यांनी केले तर सूत्रसंचालन प्रल्हाद भोसले व संजीवनी शेंडगे यांनी केले. तर आभार गणेश माने यांनी मानले. तर या कार्यक्रमाची सांगता हभप रामदास महाराज माने यांनी पसायदानाने केली.

माहिती व जनसंपर्क विभागातील सुमित राठोड यांच्यावर अंत्यसंस्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

यवतमाळ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे कार्यरत सहायक अधीक्षक सुमित हरिदास राठोड (वय ४५) यांचे शनिवारी विरार येथील राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज यवतमाळ येथील मोक्षधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी सुमित राठोड यांच्या निवासस्थानी जाऊन पार्थिवाचे दर्शन घेतले. तसेच त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. सुमित राठोड हे मूळचे यवतमाळ जिल्ह्यातील रहिवासी होते. सन २००८ मध्ये त्यांची माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे लिपिक पदावर नियुक्ती झाली होती. गेल्या १८ वर्षांपासून ते महासंचालनालयात कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी विविध शाखांमध्ये जबाबदारीने आणि कुशलतेने कामकाज सांभाळले. त्यांच्या आकस्मिक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अंत्यसंस्कारप्रसंगी डॉ. टी.सी. राठोड, देवानंद पवार, राठोड परिवारातील सदस्य, नातेवाईक, मित्रपरिवार, मंत्रालयातील अधिकारी-कर्मचारी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि पत्रकार बांधव उपस्थित होते.

निफाड येथे जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्राचे वितरण

मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आत्मा आहे : राजाराम पाटील पानगव्हाणे



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आत्मा आहे. मतदार यादीतून कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव वगळले जाणार नाही, याची खबरदारी घेणे ही निवडणूक व्यवस्थेची जबाबदारी आहे.राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या 'मत वाचवा, देश वाचवा' या अभियानाच्या अनुषंगाने आपण आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक गावात जनजागृती करून हे भ्रष्टाचारी सरकार हटविण्यासाठी सिद्ध झाले पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजाराम पाटील पानगव्हाणे यांनी केले ते निफाड काँग्रेस भवन येथे पदाधिकारी नियुक्तीपत्र वितरण कार्यक्रमात बोलत होती.

निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या व जिल्हा कार्यकारणी मध्ये समाविष्ट केलेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र वितरण सोहळा निफाड काँग्रेस भवनात संपन्न झाला या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पाटील पानगव्हाणे,तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भारत टाकेकर, रमेश काहांडोळ, गौरव पानगव्हाणे,दिगंबर गीते, सचिन होळकर, निलेश चव्हाण, प्रकाश अडसरे, उमाकांत गवळी, कातोरे, विनायक शिंदे, मधुकरराव शेलार, विजय जाधव, दीपक बोरस्ते,सचिन खडताळे, वैकुंठ चोपडे, रोहिणीताई शेळके, शकीलभाई शेख, जयश्री कर्डक, हिना पठाण आदी उपस्थित होते सर्व मान्यवरांचा निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक निफाड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष साहेबराव पाटील ढोमसे यांनी केली यावेळी नवनियुक्त जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले याप्रसंगी दिगंबर गीते, सचिन होळकर, भारत टाकेकर, रमेश कहांडोळ यांची भाषणे झाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शामराव शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन अन्वर शेख यांनी केले कार्यक्रमास मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते

निफाड तालुका कार्यकारणी मध्ये समावेश

उपाध्यक्ष = सतीश कोल्हे (खेडे), पुंजा तासकर (दिंडोरी तास), संजय शिंदे (खडक माळेगाव), वैकुंठ चोपडे (लोणवाडी), रघुनाथ सानप (शिवरे), प्रभाकर खापरे (शिवडी), शाम कोल्हे (खेडे), सुरेश भोज (चांदोरी), संपतराव ढोमसे(गोरठाण), युनूस शहा (पिंपळगाव ब.), कृष्णा सोनवणे (ओझर), बाबाजी ढोमसे (पचकेश्वर), जयराम मोरे (शिरसगाव), सरचिटणीस= शामराव मोरे (पिंपळगाव ब.), महेश शिरसाट (विंचूर) सहास सुरळीकर (निफाड), भाऊसाहेब पडोळ (सोनेवाडी), अतुल डुंबरे (वनसगाव) संकेत निकम (नांदुर्डी) होनाजी चौधरी (दीक्षी), शरद निर्भवणे (उगाव), मिरानभाई पठाण (लासलगाव), चिटणीस= फत्तुभाई शेख (सुकेने) मनीष शिंदे (वनसगाव), मधुसूदन आव्हाड (पिंपळस), भागुनाथ जाधव (धारणगाव) सतीश पवार (लासलगाव), बाळासाहेब जाधव (नांदुर्डी) संजय थेटे (पालखेड), संजय गांगुर्डे (उगाव) सुरेश जाधव (पिंपळगाव ब.) परसराम जाधव (कोठुरे), ॲड. संदेश मोगल (सुकेने)

सहचिटणीस = दौलत म हाले (शिवडी) अमोल निचित (सोनेवाडी), बाबासाहेब सोमवंशी (सुंदरपूर), बबन शिंदे (खडक माळेगाव), केदारनाथ घोटेकर (खेडलेझुंगे), संतोष गांगुर्डे (पिंपळगाव ब) संजय पाटील (उगाव), योगेश डुंबरे(सारोळे) बाळासाहेब वाघ (रानवड) तुषार खर्डे (सायखेडा), बालम सय्यद (करंजी) गणेश धोत्रे (ओझर), प्रशांत धुमाळ (दावचवाडी)

शहराध्यक्ष= पतींग ढोमसे (उगाव), मधुकर सालकाडे (विंचूर), अनिल बकरे (लासलगाव) दीपक बनकर (पिंपळगाव ब.) विलास पानगव्हाणे-उगाव ब्लॉकअध्यक्ष,

सुनील भावना (ओझर), नरेंद्र गीते सायखेडा -गटप्रमुख

जिल्हा कार्यकारिणीत समावेश

दिगंबर गीते, निर्मलाताई खर्डे,प्रकाश अडसरे, निलेश चव्हाण,भैय्यासाहेब देशमुख, सचिन होळकर, उमाकांत गवळी, ज्ञानेश्वर चव्हाण, विनायक शिंदे,विजय जाधव, शकीलभाई शेख, भाऊसाहेब शिंदे, माधराव निचित, जावेदभाई मणियार, शामराव शिंदे, डॉ. विकास चांदर, आशिफभाई शेख, रमेश संगमनेरे

दैनिक
यश सिद्धि न्यूज

सोमवार दि. १६ नोव्हेंबर २०२६

अडचणींवर मात करत अक्कलकोट एसटी आगाराची प्रगतीकडे वाटचाल

आगारप्रमुखांचे काटेकोर नियोजन, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे भक्कम पाठबळ; २९ कोटींच्या आधुनिक बसस्थानकाच्या उभारणीला वेग

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि देशाच्या विविध भागांतून वर्षभर लाखो भाविक अक्कलकोटमध्ये दाखल होतात. त्यामुळे अक्कलकोट एसटी आगाराला केवळ प्रवासी वाहतुकीचे केंद्र म्हणून नव्हे, तर धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीनेही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. एकेकाळी जुन्या बसगाड्या, आर्थिक अडचणी, वाढता खर्च, नियोजनाचा अभाव आणि पायाभूत सुविधांची कमतरता अशा विविध समस्यांना सामोरे जाणाऱ्या अक्कलकोट एसटी आगाराची आता प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. आगारप्रमुखांचे काटेकोर नियोजन, कर्मचाऱ्यांचे योगदान, प्रवाशांच्या गरजांचा विचार आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे सहकार्य यामुळे आगाराच्या कामकाजाला नवी दिशा मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.



अडचणींच्या गर्तेतून प्रगतीच्या दिशेने वाटचाल

काही काळापूर्वी अक्कलकोट एसटी आगाराची परिस्थिती अनेक कारणांमुळे आव्हानात्मक बनली होती. जुन्या बसगाड्या, देखभाल-दुरुस्तीचा वाढता खर्च, बससेवांचे नियोजन, प्रवाशांच्या वाढत्या अपेक्षा आणि आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे आगाराच्या कार्यक्षम तेवर परिणाम होत होता. मात्र, अलिकडे परिस्थितीचा विचार करून वाहतूक व्यवस्थापन, बसफेऱ्यांचे नियोजन, उपलब्ध बसगाड्यांचा योग्य वापर आणि प्रवासी सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला जात आहे.

आगाराचा कारभार अधिक शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध करण्यासाठी आगार प्रमुख सत्यजित खताळ परिश्रम घेताना दिसून येत आहेत. बसगाड्यांची उपलब्धता, वेळापत्रकाचे पालन, देखभाल-दुरुस्ती, स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांच्या कामाचे योग्य नियोजन या बाबींना सत्यजित खताळ अधिक महत्त्व देताना दिसून येत आहेत.

२९ कोटींच्या आधुनिक बसस्थानकाची उभारणी

अक्कलकोट शहराच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे सुमारे २९ कोटी रुपये खर्चाच्या नव्या बसस्थानकाचे सुरू असलेले पुनर्निर्माणाच्या कामाला अधीक वेग आला आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या आणि स्थानिक नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक बसस्थानक उभारणीला अधिक महत्त्व आले आहे. बसस्थानक परिसरातील वाहतूक सुरळीत करणे, उपलब्ध जागेचा योग्य वापर करणे आणि प्रवाशांना सुरक्षित व सोयीस्कर वातावरण उपलब्ध करून देणे या दृष्टीने नव्या बसस्थानकाचे काम महत्त्वाचे ठरणार आहे.

बसस्थानक परिसरातील अतिक्रमणे हटविण्याच्या कारवाईमुळे वाहतुकीसाठी आणि नियोजनबद्ध विकासासाठी जागा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. आधुनिक बसस्थानक पूर्ण झाल्यानंतर अक्कलकोटच्या धार्मिक पर्यटनाला आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला अधिक चालना मिळण्याची शक्यता आहे.



धार्मिक पर्यटनामुळे उत्पन्नवाढीची मोठी संधी

अक्कलकोट हे महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्रांपैकी एक असल्यामुळे येथे वर्षभर भाविकांची वर्दळ असते. गुरुवार, पौर्णिमा, सण-उत्सव आणि सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांची संख्या वाढते. त्यामुळे एसटी महामंडळासाठी अक्कलकोट आगाराला उत्पन्नवाढीच्या दृष्टीने मोठी संधी उपलब्ध आहे.

पुणे, मुंबई आणि राज्यातील इतर प्रमुख शहरांमधून अक्कलकोटला येणाऱ्या भाविकांसाठी थेट बससेवा आणि नियमित बसफेऱ्या महत्त्वाच्या ठरत आहेत.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे सहकार्य महत्त्वाचे

अक्कलकोटच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधींचे सहकार्य आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा महत्त्वाचा ठरतो. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सहकार्यामुळे बसस्थानकाच्या विकासासह प्रवाशांच्या सुविधांशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य मिळत आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे सहकार्य, परिवहन महामंडळाचे धोरण आणि स्थानिक प्रशासनाचा समन्वय साधला गेल्याने अक्कलकोट आगाराच्या विकासाला अधिक गती मिळताना दिसून येत आहे.

उपलब्ध बसगाड्यांचा योग्य वापर, प्रवाशांच्या संख्येनुसार बसफेऱ्यांचे नियोजन, वेळेचे पालन, वाहनांची देखभाल, कर्मचाऱ्यांमधील समन्वय आणि अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवण्यात यशस्वी झाल्याने सध्या

अक्कलकोट एसटी आगाराची वाटचाल प्रगतीकडे सुरु आहे.

– सत्यजित खताळ, आगार प्रमुख अक्कलकोट.

नम्रता मोरे यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कौशिक राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शांतिनिकेतन गुरुकुल परिसरातील पदाधिकारी व शिक्षक, पिंपरी चिंचवड येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलात झालेल्या विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत शांतिनिकेतन गुरुकुल परिसरातील राहुल गांधी माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी नम्रता बापू मोरे हिने १४ वर्षावरील मुलींच्या २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत दुतीय क्रमांक या यशामुळे तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे तिच्या या याच्याबद्दल संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय कोडरकर सचिव मंगल कोडलकर मुख्याध्यापिका रतन पांढरे प्राचार्य बाळासाहेब शिंदे यांच्यासह गुरुकुल परिवारातील पदाधिकारी व शिक्षकांनी तिचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सौ. कौशल्याबाई केंद्रे यांच्याकडून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीस एक लाख रुपयांची देणगी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून मंदिर समितीस विविध स्वरूपात देणगी अर्पण केली जाते. त्याच अनुषंगाने सौ. कौशल्याबाई शिवाजी केंद्रे, रा. माळाकोळी, ता. लोहा, जि. नांदेड यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीस रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) इतकी रक्कम देणगी स्वरूपात अर्पण केली.

यावेळी मंदिर समितीचे सदस्य श्री. ज्ञानेश्वर जळगावकर यांच्या हस्ते देणगीदार सौ. कौशल्याबाई केंद्रे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव उपस्थित होते.



शेलगाव (दि.) येथे ग्रामदैवत सय्यद बाबा दर्ग्याचा उरूस उत्साहात साजरा

सांस्कृतिक कार्यक्रम, राजा-राणीचे सोंग, हत्ती मिरवणूक अन् जंगी कुस्तीच्या फडाने उरुसाची सांगता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मौजे शेलगाव दिवानी येथील ग्रामदैवत सय्यद बाबा दर्ग्याचा वार्षिक उरूस यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आयोजित करण्यात आलेल्या या उरुसामध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सोंग, राजा-राणीची वेशभूषा, हत्तीची मिरवणूक अशा विविध आकर्षक उपक्रमांमुळे उरुसाला विशेष रंगत आली.

या उत्सवासाठी परिसरातील विविध गावांमधून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. उरुसाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या जंगी कुस्तीच्या मैदानात जिल्ह्यासह परजिल्ह्यातील नामांकित मल्लांनी सहभाग घेतला. कुस्तीच्या फडातील डावपेच पाहण्यासाठी कुस्तीप्रेमी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.



धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि कुस्तीच्या मैदानातील चुरस अशा उत्साही वातावरणात सय्यद बाबा दर्ग्याच्या वार्षिक उरुसाची सांगता झाली.

कामगार संहितांबाबत जनजागृतीसाठी १८ नोव्हेंबर रोजी सोलापुरात 'श्रम संवाद' कार्यक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/जिमाका : भारत सरकारच्या कामगार व रोजगार मंत्रालयामार्फत देशभरात कामगार संहितांबाबत जनजागृती करण्यासाठी 'श्रम संवाद - जिल्हास्तरीय क्षमता बांधणी व जनजागृती' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश नियोक्ते, औद्योगिक प्रतिनिधी, मानव संसाधन (क्ष) व वित्त विभागातील अधिकारी, कायदेविषयक व्यावसायिक, सनदी लेखापाल तसेच इतर संबंधित घटकांना कामगार संहितांमधील विविध तरतुदींची माहिती देणे आणि त्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे. सोलापूर जिल्ह्यातील हा कार्यक्रम बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, पी-७, जयकुमारजी पाटील उद्योग भवन, एम आयडीसी, चिंचोळी, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी, नियोक्ते, उद्योग प्रतिनिधी, मानव संसाधन व वित्त विभागातील अधिकारी, कायदेविषयक व्यावसायिक, सनदी लेखापाल तसेच इतर संबंधित घटकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कामगार संहितांबाबतची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर श्री. मंगेश रा. झोले यांनी केले आहे.

भाजपा जिल्हाध्यक्ष तथा मा. आमदार विजयराज शिंदे यांच्यातर्फे गरजू महिलांना साडी व फराळाचे वितरण



जनुना तांड्यावर वंचिताची दिवाळी साजरी उत्साहात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : समाजातील वंचित, दीनदुबळे आणि गरजू कुटुंबांनाही मुख्य प्रवाहात आनंदाने दिवाळी साजरी करता यावी, या उदात्त सामाजिक उद्देशाने जनुना तांडा येथे भाऊबीजेच्या मुहूर्तावर एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा मा. आमदार विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमामुळे जनुना तांड्यावरील शेकडो महिलांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा खरा आनंद पाहायला मिळाला.

भाऊबीजेच्या मुहूर्तावर आनंदाची शिदोरी

दिवाळी हा प्रकाश आणि आनंदाचा सण. मात्र, आर्थिक परिस्थितीअभावी अनेक गरजू कुटुंबांना हा सण हवा तसा साजरा करता येत नाही. ही खंत ओळखून मा. आमदार विजयराज शिंदे यांनी जनुना तांडा येथील वंचित घटकांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवण्याचा संकल्प केला. भाऊबीजेच्या पवित्र दिवशी आयोजित या कार्यक्रमात जनुना तांडा येथील महिलांना सन्मानाने नवीन साड्या आणि दिवाळीच्या गोड फराळाचे वितरण करण्यात आले.

महिलावर्गात उत्साहाचे व कृतज्ञतेचे वातावरण

साडी व फराळ मिळाल्यानंतर महिलांच्या चेहऱ्यावरचा आनंद होता. आमच्यासारख्या सर्वसामान्य व वंचित कुटुंबांचीही दिवाळी गोड व्हावी, यासाठी नेत्यांनी आमच्या दारात येऊन घेतलेली ही काळजी अत्यंत मोलाची आहे, अशा शब्दांत महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या उपक्रमामुळे संपूर्ण जनुना तांड्यावर एकीचा आणि सणाचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

समाजसेवेचा वसा निरंतर सुरू राहणार – विजयराज शिंदे

यावेळी बोलताना, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना आणि मदतीचा हात पोहोचवणे हे आपले कर्तव्य असल्याचे प्रतिपादन भाजपा जिल्हाध्यक्ष तथा मा. आमदार विजयराज शिंदे यांनी केले. सणासुदीच्या काळात कोणीही वंचित राहू नये, यासाठी अशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम भविष्यातही सातत्याने राबवले जातील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमास उल्हास राव देशपांडे, संतोष दसरे, शंकर उगलमुगले सर, अंकुर देशपांडे, शिवाजी वाघ, विठ्ठल राठोड अन्य स्थानिक कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी ते साठी विठ्ठल राठोड यांनी प्रयत्न घेतले.

मंदिर परिसरात ज्वालाग्राही पदार्थांच्या वाहतुकीस व साठवणुकीस प्रतिबंध

उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांचे प्रतिबंधात्मक आदेश जारी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी यात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात गॅस सिलिंडर, केरोसीन तसेच स्फोटक व ज्वालाग्राही पदार्थांची वाहतूक आणि साठवणूक करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबत उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. कार्तिकी यात्रेचा कालावधी दि. १० ते २४ नोव्हेंबर २०२६ असा असून, या कालावधीत पंढरपूर येथे सुमारे ८ ते १० लाख भाविक येण्याची शक्यता आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महाद्वार घाट, प्रदक्षिणा मार्ग, मंदिर परिसर, नामदेव पायरी तसेच मंदिराच्या आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. या गर्दीच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलिंडर, केरोसीन व अन्य ज्वालाग्राही पदार्थांची साठवणूक किंवा वाहतूक केल्यामुळे संभाव्य दुर्घटना घडून जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दि. २० ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत मंदिर परिसरात गॅस, केरोसीन व स्फोटकजन्य पदार्थांची वाहतूक तसेच साठवणूक करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. संबंधित व्यापारी, दुकानदार व हॉटेल व्यावसायिकांनी या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.